''स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद - कर्मवीर ''



रयत शिक्षण संस्थेचे,

# छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा (महाराष्ट्र)



Reaccredited with 'A+' Grade by NAAC (CGPA : 3.51)
College with Potential for Excellence (CPE) Status Awarded by U.G.C.
Lead College Status Awarded by Shivaji University, Kolhapur

**Phone :** 02162-234678, 226263 **Fax :** 02162-234678
**Emil :** chhshiv@dataone.in **Website :** www.erayat.org/cscs **Estd.:** 1947

।। संस्थापक ।।

पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील (डी.लिट्.)




OUR MISSION
LABORARE EST ORARE

## माहिती पत्रक

## उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम

''स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद - कर्मवीर ''

रयत शिक्षण संस्थेचे,

# छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा

संस्थापक : **कर्मवीर भाऊराव पाटील**, डी. लिट्

## व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रम

महाविद्यालयात सन १९९० पासून केंद्रशासन संचलित उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम सुरू आहेत. हे व्यवसाय अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना नोकरी आणि स्वयंरोजगार उपलब्ध होण्यासाठी उपयुक्त आहेत. या अभ्यासक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना संबंधित क्षेत्रातले आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात होते आणि त्याचा त्यांना नोकरी तसेच स्वयंरोजगारासाठी उपयोग होतो.

महाविद्यालयात खालील तीन व्यवसाय अभ्यासक्रम आहेत.

| अभ्यासक्रमाचे नांव | विद्यार्थी क्षमता | |
|---|---|---|
| | इयत्ता ११ वी | इयत्ता १२ वी |
| १. फलोद्यान शास्त्र (Horticulture) | २० | २० |
| २. पीक शास्त्र (Crop Science) | २० | २० |
| ३. पर्यटन व आदरातिथ्य व्यवस्थापन (Tourism & Hospitality Management) | २० | २० |

### व्यवसाय अभ्यासक्रमांची ठळक वैशिष्ट्ये :

१) अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर महाराष्ट्र शासनाच्या व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाद्वारे प्रमाणपत्र देण्यात येते. त्याचा नोकरी/शिकाऊ उमेदवारी (अ‍ॅप्रेंटिसशिप) अथवा स्वयंरोजगारासाठी बँकांकडून अर्थसहाय्य मिळविण्यासाठी उपयोग होतो.

२) नोकरीची संधी : फलोद्यानशास्त्र व पीकशास्त्र अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेले विद्यार्थी, महाराष्ट्र शासनाच्या तलाठी, ग्रामसेवक, कृषीसेवक, कृषी पर्यवेक्षक, फलोद्यान सहाय्यक इ. पदांसाठी पात्र आहेत.

३) तसेच टूरिझम अ‍ॅण्ड हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंट (पर्यटन व आदरातिथ्य व्यवस्थापन) अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना केंद्र व राज्यशासनाच्या पर्यटन विभागातील (I.T.D.C.& M.T.D.C.) पदांसाठी नोकरीच्या संधी. उदा. पर्यटन सहाय्यक, सहल व्यवस्थापक, टूरिस्ट गाईड, व्हिसा पासपोर्ट व ट्रॅव्हल एजंट, पर्यटन सल्लगार इ. हॉटेल व्यवसाय - हॉटेल व्यवस्थापक, सहव्यवस्थापक, रिसेप्शनिस्ट, बुकिंग क्लार्क इ. ट्रॅव्हल एजन्सींमध्ये - व्यवस्थापक,बुकिंग क्लार्क, टूर ऑपरेटर, टूरिस्ट ऑफिसर इ.

४) टूरिझम अ‍ॅण्ड हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंट अभ्यासक्रम उत्तीर्ण विद्यार्थ्यांना मुक्त विद्यापीठाच्या टूरिझम विषयातील पदवी अभ्यासक्रमाकरिता प्रवेश घेता येतो. तसेच हॉटेल मॅनेजमेंट अ‍ॅन्ड केटरिंग टेक्नॉलॉजी या अभ्यासक्रमाकरिता प्रवेश घेता येतो.

५) वरील तिन्ही अभ्यासक्रमांमध्ये विद्यार्थ्यांना तांत्रिक कौशल्य व आत्मविश्वास प्राप्त होण्यासाठी महाविद्यालयाच्या सुसज्ज प्रयोगशाळा तसेच तिन्ही अभ्यासक्रमांशी निगडीत व्हिडीओ कॅसेट, स्लाईड शो व L.C.D. द्वारे आधुनिक प्रात्यक्षिक ज्ञान दिले जाते. तसेच वेळावेळी खाजगी व सरकारी उद्योगांना, संबंधित शिक्षण केंद्रांना भेटी देवून त्यांना संबंधित क्षेत्राचे सखोल ज्ञान आत्मसात होण्यासाठी प्रयत्न केले जातात. त्या दृष्टीने विद्यार्थ्यांना तज्ज्ञांकडून वेळोवेळी वैयक्तिक मार्गदर्शन केले जाते.

६) व्यवसाय अभ्याक्रमाच्या इयत्ता १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना बी.ए., बी.कॉम, बी.एस्सी. एल. एल.बी. इ.पदवी अभ्यासक्रमांना प्रवेश मिळतो.

टीप : M.T.D.C. - महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ

I.T.D.C. - भारतीय पर्यटन विकास महामंडळ

### प्रवेशासाठी अर्हता :

१) उमेदवार एस.एस.सी. (इ.१० वी) पास असावा.

२) विद्यार्थ्यांचे वय प्रवेश घेतेवेळी २० वर्षांपेक्षा जास्त नसावे.

(मागासवर्गीय २ वर्षे शिथिलक्षम)

### अभ्यासक्रमांची माहिती :

**१) फलोद्यान शास्त्र (Horticulture) : KA, KB, KC**

या अभ्यासक्रमात खालील गोष्टींबाबत आधुनिक तंत्रज्ञान विद्यार्थ्यांना शिकवले जाते.

१) फलोद्यान शास्त्राची मूलभूत तत्वे व घटक

२) वनस्पती अभिवृध्दी, रोपवाटिका व्यवस्थापन व वनीकरण

३) फळझाडांची लागवड

४) भाजीपाला लागवड

५) फलोत्पादन व उद्याननिर्मिती

६) फळे व भाजीपाला प्रक्रिया आणि टिकवण

हा अभ्याक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना खालील नोकरी/स्वंयरोजगाराच्या संधी तसेच सरकारी विद्यावेतनाच्या आधारे एक वर्षाचा प्रशिक्षण कार्यक्रम (अ‍ॅप्रेंटिसशिप) पूर्ण करण्याची संधी प्राप्त होते.

**अ) नोकरी विषयक संधी :**

१) हा अभ्यासक्रम पूर्ण केलेले विद्यार्थी महाराष्ट्र शासनाच्या ग्रामसेवक, तलाठी, फलोद्यान सहाय्यक, कृषी सेवक व तत्सम पदांकरिता पात्र आहेत.

२) फलोद्यान पर्यवेक्षक (Horticulture Supervisor)

३) फलोद्यान सहाय्यक (Horticulture Assistant)

४) उद्यान पर्यवेक्षक (Garden Supervisor)

५) प्रशिक्षित माळी (Gardener)

६) कृषी क्षेत्रातील, खते, बी-बियाणे, किटकनाशके, औजारे इ. च्या विक्री व्यवसायामध्ये विक्री प्रतिनिधी, विक्री अधिकारी इ. (Sales Representative, Sales Officer)

७) बीजोत्पादक सहाय्यक (Seed Production Assistant)

८) फलोद्यान व्यवसाय शिक्षण सहाय्यक

(Horticulture Vocational Education-Practical Teacher)

### ब) स्वयंरोजगाराच्या संधी :

१) फलोद्यान रोपवाटीका

(Nursery of Fruit, Flower, Ornamental plants)

२) उद्यान निर्मितीचा कॉन्ट्रॅक्टर व्यवसाय

(Garden Development, Garden Maintenance Contracts)

३) फुलांचे दुकान (Florist Shop)

४) खते, बी-बीयाणे, कीटकनाशके, तणनाशके, औजारे इ. चा विक्री व्यवसाय.

५) फळे व भाजीपाला प्रक्रिया केंद्र (टिकाऊ पदार्थ निर्मिती उद्योग)

(Processing plants for Jam, Jelly, Marmalade, Ketchup, etc. production)

६) शीतगृहातील फळे/भाजीपाला साठवण

(Preservation of fruit and vegetables in Cold Storage)

७) याशिवाय फलोद्यान क्षेत्राशी निगडीत असंख्य छोटे व मोठे व्यवसाय

### ठळक वैशिष्टये :

भारतात कृषीक्षेत्राला, विशेषत: फलोद्यानाला असलेले महत्व लक्षात घेऊन या क्षेत्रात कौशल्य प्राप्त, तांत्रिक ज्ञान अवगत असलेले लोक निर्माण करण्याच्या दृष्टीकोनातून या अभ्यासक्रमाची निर्मीती झालेली असून या अभ्यासक्रमाची ठळक वैशिष्टये खालीलप्रमाणे आहेत.

१) विद्यार्थ्यांना महाविद्यालयात तांत्रिक ज्ञानाच्या अध्यापनासाठी व प्रात्यक्षिकांसाठी सुसज्ज प्रयोगशाळा व आधुनिक शेती उपलब्ध.

२) विविध कृषी शिक्षण संस्था/संशोधन प्रकल्प, संशोधन केंद्रांना भेटीद्वारे विद्यार्थ्यांना फलोद्यान क्षेत्राचे जवळून मार्गदर्शन.

३) नोकरी/स्वंयरोजगारासाठी विद्यार्थ्यांना वैयक्तिक मार्गदर्शन.

## २) पीकशास्त्र : (Crop Science) LA, LB, LC

भारताने बहुचर्चित गॅट करार स्वीकारलेला असल्याने या करारांतर्गत भारतामधून परदेशामध्ये होणाऱ्या औद्योगिक उत्पादनांच्या निर्यातीपेक्षा कृषी निर्यातीसच अधिक वाव व संधी आहे. त्यामुळे भारतीय शेतीला नवसंजीवनी मिळाली आहे. या कराराचा भारताला अधिकाअधिक फायदा करून घेण्यासाठी केंद्र व राज्यशासन प्रयत्नशील आहे व त्यादृष्टीने कृषीविकास व कृषी उत्पादन वाढीसाठी सरकारकडून विविध योजना व धोरणे राबविली जात आहेत. या योजना व धोरणांचा स्वत:ला फायदा करून घ्यायचा असेल तर प्रत्येकजण आधुनिक शेती ज्ञानात प्रशिक्षित असला पाहिजे.

आजच्या स्पर्धेच्या युगात कृषी क्षेत्रात टिकून राहावयाचे असेल तर प्रत्येकाने व्यावसायिक शेतीचे प्रगत कृषी तंत्रज्ञान आत्मसात करणे आवश्यक आहे. प्रगत कृषितंत्राद्वारे शेती करून अधिकाअधिक उत्पादन व नफा मिळविण्यच्या दृष्टीने तसेच रोजगाराच्या नवनवीन संधी उपलब्ध करून बेकारी दूर करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाने पीकशास्त्र या व्यवसाय अभ्यासक्रमाची रचना केली आहे. या अभ्यासक्रमाचा ग्रामीण व शहरी अशा दोन्ही भागातील विद्यार्थ्यांना स्वयंरोजगार व नोकरी मिळविण्याच्या दृष्टीने उपयोग होणार आहे.

### पीकशास्त्र अभ्यासक्रमाची रचना :

पीकशास्त्र या व्यावसायिक अभ्याक्रमात विद्यार्थ्यांना खालील घटकांमधील प्रगत कृषीतंत्रज्ञान शिकवले जाते.

कृषी हवामानशास्त्र
मातीची जडणघडण व माती परीक्षण
आधुनिक कृषी अवजारे
पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम/पाणी आडवा पाणी जिरवा
पिकांचे पाणी व्यवस्थापन करणे,खते व्यवस्थापन आणि
कीड व रोग नियंत्रण, अन्नधान्ये पिके व
कडधान्य पिके उत्पादन, तेलबिया पिके
नगदी पिकांचे उत्पादन-ऊस, कापूस, भूईमूग इ.
फळा-फुलांची रोपवाटीका, हरितगृह तंत्रज्ञान, अळिंबी उत्पादन, गांडूळ शेती, परसबाग इ.
वनशेती व वनरोपवाटीका व्यवस्थापन
शेतवाडीचे व्यवस्थापन आणि कोरडवाहू/बागायती शेती तंत्रज्ञान
कृषि मालाचे वितरण (मार्केटिंग), विविध पिकांचे बीजोत्पादन, बी-बियाणे चाचणी इ.

### पीकशास्त्र अभ्यासक्रमाची ठळक वैशिष्टये :

१) कृषिशास्त्राशी संलग्न दोन वर्षाचा अभ्यासक्रम

२) सुसज्ज प्रयोगशाळा व अत्याधुनिक उपकरणांच्याद्वारे अध्ययन व प्रात्यक्षिक

३) प्रत्येक विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष

४) व्यावसायिक अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर एक वर्षाचा प्रशिक्षण कार्यक्रम (अॅप्रेंटिसशिप) सरकारी विद्यावेतनाच्या आधारे पूर्ण करण्याची संधी

५) वेळोवेळी स्थानिक आधुनिक शेती प्रक्षेत्रांना भेटी व तज्ञांचा सल्ला

६) शैक्षणिक सहलींचे आयोजन (कृषिविद्यापीठ व संशोधन केंद्रांना भेटी)

हा व्यावसायिक अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर खालील प्रकारच्या संधी उपलब्ध होतात.

### अ) नोकरीच्या संधी :

१) जिल्हा परिषदेच्या कृषी खात्यामध्ये कृषिसेवक/कृषी पर्यवेक्षक

२) ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रातील ग्रामसेवक, तलाठी

वरील सर्व पदांच्या भरतीसाठी पीकशास्त्र अभ्यासक्रम पूर्ण केलेले विद्यार्थी पात्र आहेत.

३) शासकीय वनरोपवाटिका व अन्य रोपवाटिका सहाय्यक

४) पीक उत्पादन सहाय्यक

५) प्रक्रिया उद्योगांमध्ये प्रक्रिया सहाय्यक

६) बीजोत्पादन निरीक्षक

७) वनशेती सहाय्यक

८) कृषि क्षेत्रातील खते, बी-बीयाणे, किटकनाशके, अवजारे इ. च्या विक्री व्यवसायामध्ये विक्री प्रतिनिधी, विक्री अधिकारी इ.

९) प्रयोगशाळा सहाय्यक

१०) पीकशास्त्र व्यवसाय शिक्षक सहाय्यक

### ब) स्वयंरोजगाराच्या संधी :

१) पीक उत्पादन : अन्नधान्य, नगदी पीके, कडधान्ये इ.

२) बीजोत्पादन

३) पीक उत्पादन सल्लागार

४) कृषिक्षेत्राशी निगडीत लघुव्यवसाय करण्यासाठी बँकाद्वारे अर्थसहाय्य व मार्गदर्शन

### ३) टुरिझम अॅन्ड हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंट (Tourism & Hospitality Management) पर्यटन व आदरातिथ्य व्यवस्थापन TA, TB, TC

पर्यटनशास्त्राशी निगडीत दोन वर्षांच्या हा अभ्यासक्रम असून यांमध्ये विविध पर्यटन क्षेत्रांना भेटी देऊन प्रात्यक्षिक ज्ञान दिले जाते. तसेच विद्यार्थ्यांना प्रोजेक्टर, व्हिडीओ, स्लाईड शो, एल.सी.डी. यांद्वारे मार्गदर्शन केले जाते.

या अभ्यासक्रमात खालील बाबीविषयक तंत्रज्ञान विद्यार्थ्यांना दिले जाते.

१) पर्यटनाची ओळख व संकल्पना

२) कार्यक्रम व्यवस्थापन (Event Management)

३) आधुनिक आदरातिथ्य व्यवस्थापन

४) वाहतूक

५) हॉटेल उद्योग व संपर्क व्यवसाय संज्ञापन

६) ट्रॅव्हल्स एजन्सी व्यवस्थापन

७) व्हिसा, पासपोर्ट, पर्यटन बाजारपेठ, व व्यावसायिक कौशल्ये

८) पर्यटन व्यवसायातील M.T.D.C. व I.T.D.C. ची भूमिका

९) भारतीय इतिहास, मुर्तिकला, शिल्पकला व वास्तू कला

१०) आंतरराष्ट्रीय पर्यटन अंतर्गत पर्यटन व आदरातिथ्य

हा अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना खालील नोकरी/नोकरीविषयक संधी रोजगार व स्वयंरोजगार तसेच एका वर्षाचा प्रशिक्षण कार्यक्रम (अॅप्रेंटिसशिप–शिकाऊ उमेदवारी) सरकारी विद्यावेतनाच्या आधारे पूर्ण करण्याची संधी मिळते.

अ) केंद्र व राज्य पर्यटन संस्थांमध्ये :

१) टूरिस्ट गाईडस् (सहल मार्गदर्शक)

२) सहल व्यवस्थापक

३) काउंटर सेल/रिझर्वेशन असिस्टंट

४) लोकसंपर्क/अतिथ्य सेवा सेवक

५) माहिती वर्गसेवक

६) पर्यटन सहाय्यक

वरील पदांसाठी, शासकीय सेवेतील पदांसाठी आणि रेल्वे रिक्रुटमेंट बोर्डाद्वारे घेतल्या जाणाऱ्या परीक्षांसाठी पर्यटन अभ्यासक्रम पूर्ण केलेले विद्यार्थी पात्र आहेत.

ब) ट्रॅव्हल एजन्सीमध्ये :

१) टूरिस्ट गाईडस्

२) रिझर्वेशन/बुकिंग असिस्टंट

३) सहल व्यवस्थापक

४) वाहतूक सहाय्यक

५) टूर ऑपरेटर

क) भारतीय रेल्वेमध्ये :

१) टूरिस्ट गाईडस्

२) पर्यटन माहिती वर्गसेवक

३) रेल्वे केटरींग अॅन्ड टूरिझम

ड) हॉटेल उद्योगामध्ये :

१) कॅशिअर/रिसेप्शनिस्ट

२) हाऊसकिपर

३) रिझर्वेशन/इनफर्मेशन क्लार्क

४) रेस्टॉरंट सुपरव्हायझर

इ) स्वयंरोजगार संधी :

१) सहल व्यवस्थापक

२) पर्यटन सल्लागार

३) धार्मिक सहलव्यवस्थापक

४) गाईडस्/मॅप/पोस्टर्स विक्री

५) वाहतूक/टुरिस्ट कार/बसेस व्यवस्थापक

६) व्हिसा/पासपोर्ट एजंट

फी/सवलती/शिष्यवृत्ती वगैरे :

१) विद्यार्थ्यांना ई.बी.सी. फी सवलत आणि मागासवर्गीय शिष्यवृत्ती मिळतात.

२) विद्यार्थिनींना फी सवलत

३) फी सवलत प्राप्त होऊ न शकणाऱ्या विद्यार्थ्यांना एकूण फी पुढीलप्रमाणे आहे. यामध्ये शासनाकडून बदल झाल्यास त्यानुसार बदल होईल

## इ. ११ वी/१२ वी व्यवसाय अभ्यासक्रम प्रवेश फी

### वर्ष : २०२०-२०२१ अनुदानित

| अ. क्र. | तपशील | अकरावी | | | बारावी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | शिष्यवृत्ती घेणारे विद्यार्थी | सवलत घेणारे विद्यार्थी | सवलत न घेणारे विद्यार्थी | शिष्यवृत्ती घेणारे विद्यार्थी | सवलत घेणारे विद्यार्थी | सवलत न घेणारे विद्यार्थी |
| १. | प्रवेश फी | – | – | २० | – | – | – |
| २. | शिक्षण फी | – | २४० | २४० | – | ३०० | ३०० |
| ३. | टर्म फी | – | – | ४० | – | – | ५० |
| ४. | लॅब (कार्यशाळा)फी | – | – | ८० | – | – | १०० |
| ५. | विकास निधी | – | ६०० | ६०० | – | ६०० | ६०० |
| ६. | एस. ए. फंड | १० | १० | १० | १० | १० | १० |
| ७. | ध्वज निधी | ०५ | १५ | १५ | ०५ | १५ | १५ |
| ८. | आपत्कालिन निधी | १० | १० | १० | १० | १० | १० |
| ९. | ओळखपत्र | ५० | ५० | ५० | ५० | ५० | ५० |
| १०. | अंतर्गत परीक्षा | १७५ | १७५ | १७५ | १७५ | १७५ | १७५ |
| | एकूण : | २५० | ११०० | १२४० | २५० | ११६० | १३१० |

टीप : वरील फी रकमेबाबत शासनाच्या आदेशानुसार बदल झाल्यास त्याप्रमाणे फी भरावी लागेल.

विषय : इ. ११ वी व इ. १२ वी व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमातील विषय खालील प्रमाणे

१) इंग्लिश
२) मराठी
३) जनरल फाऊंडेशन कोर्स
४) पर्यावरण शास्त्र
५) प्रमुख विषय : पेपर नं. १
६) प्रमुख विषय : पेपर नं. २
७) प्रमुख विषय : पेपर नं. ३

**प्रवेशाविषयी सूचना :**

अ) १) विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज भरतेवेळी आपल्या इच्छेनुसार व्यवसाय अभ्यासक्रमांचा पसंतीक्रम ठरवून त्याप्रमाणे प्रवेश अर्जामध्ये माहिती भरावी.
२) विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेनुसार व जागांच्या उपलब्धतेनुसार गुणवत्ता यादी निश्चित करण्यात येऊन त्याप्रमाणेच प्रवेश दिला जाईल.
३) प्रवेश अर्जातील माहिती भरताना बिनचूक व खाडाखोड न करता भरावी.

ब) १) महाविद्यालयाचे शिस्त पालनासंबंधीचे नियम बंधनकारक असतील.
२) विद्यार्थी/विद्यार्थिनींना गणवेश अनिवार्य आहे.

रयत शिक्षण संस्थेचे

# छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा.

## कॉलेजची ठळक वैशिष्ट्ये

१) रयत शिक्षण संस्थेचे पहिले कॉलेज (स्थापना १९४७)
२) ११ वी आर्टस् ते बी.ए. (९ स्पेशल विषय) एम.ए. (आठ स्पेशल विषय)
३) संदर्भ ग्रंथ, क्रमिक पुस्तके, नियतकालिके, यांनी समृध्द असलेले ग्रंथालय, बुक बँकेची सोय.
४) अनुभवी, तज्ज्ञ व व्यासंगी प्राध्यपक वर्ग.
५) वक्तृत्व, निबंध स्पर्धेसाठी कुशल मागदर्शक व मार्गदर्शन.
६) विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र वसतिगृहाची सोय.
७) कमवा व शिका योजनेची सोय.
८) देशी व विदेशी खेळांचे भरपूर साहित्य
९) कॉलेजची भव्य इमारत, कार्यालय, स्टाफ रूम, जिमखाना, वृक्षवेलींनी नटलेली परिसर
१०) अभ्यासिकेची सोय.
११) एन.सी.सी., एन.एस.एस. ची सोय.
१२) हुशार, गरजू, होतकरू विद्यार्थ्यांसाठी आर्थिक सवलत.
१३) उत्कृष्ट निकालाची परंपरा.
१४) विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी वैयक्तिक मार्गदर्शन
१५) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राची सोय.
१६) तीन व्यवसाय अभ्यासक्रमांची सोय.
१७) बारावीसाठी विविध विद्यार्थी प्रकल्प.
१८) गुणवत्ता सुधार प्रकल्प.
१९) बारावीसाठी उन्हाळी वर्ग.
२०) शॉर्टटर्म कोर्सची संधी : १) कॉम्प्युटर कोर्स
२) संस्कृत स्पिकिंग वर्ग
३) मॅन्युस्क्रिप्टॉलॉजी

## कार्यालयीन कामकाजाची वेळ

**सुट्टीचे दिवस व रविवार वगळता**

कार्यालयाची वेळ : **सकाळी १०.३० ते ५.३०**

लेखा विभाग : **सकाळी ११.०० ते दु. २.००**



Garden



Administrative Building



लोकनेते मा.रामशेठ ठाकूर भवन या वास्तूच्या भूमिपूजन समारंभाची कोनशिला अनावरण करताना मा.रामशेठ ठाकूर, मा.डॉ.अनिल पाटील व इतर मान्यवर




लोकनेते मा. रामशेठ ठाकूर भवन

# BEAUTIFUL CAMPUS